जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१६/संकीर्ण
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक:- १३ /०८/२०१६

प्रति,

संस्थाचालक/प्राचार्य (सर्व) ,
शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन ,
संस्थाचालक महाराष्ट्र राज्य.

विषय :- GCC-TBC ३० श.प्र.मि. परीक्षा ऑगस्ट २०१६
परीक्षा केंद्रावरील Keyboard आणि Mouse बाबत..

संदर्भ :- परीक्षा परिषदेच्या कार्यकारी समितीच्या दि.५/८/२०१६ च्या विशेष सभेतील ठराव.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भिय ठरावानुसार ऑगस्ट २०१६ मध्ये होणाऱ्या GCC-TBC ३० श.प्र.मि. परीक्षेसाठी ज्या संस्थांनी परीक्षार्थी प्रविष्ठ केले आहेत, त्या संस्थांना परीक्षा केंद्रावर स्वत:चे Keyboard आणि Mouse वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, याबाबत संस्थांनी पुढील बाबींची दक्षता व नोंद घ्यावी.

१) इंग्रजी ३० श.प्र.मि.ची परीक्षा सुरु हाण्यापूर्वी दोन दिवस अगोदर ( दि. १६ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० पर्यंत ) Keyboard आणि Mouse परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( IT टिचर) यांचेकडे जमा करावेत.
२) मराठी व हिंदी ३० श.प्र.मि.ची परीक्षा सुरु होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर ( दि. २४ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० पर्यत ) Keyboard आणि Mouse परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( IT टिचर) यांचेकडे जमा करावेत.
३) परीक्षा केंद्रावर जमा केलेले की-बोर्ड व माऊस त्या परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थ्यांना वापरण्यास उपलब्ध असतील.
४) संबंधित केंद्रावरील संपूर्ण परीक्षा पूर्ण झाल्यानंतरच हे कीबोर्ड व माऊस संस्थांना परत मिळू शकतील. म्हणजे संबंधित संस्थेस परीक्षा पूर्ण होण्यापूर्वी कीबोर्ड व माऊस परत मिळू शकणार नाहीत.
५) संस्थांनी Keyboard आणि Mouse परीक्षा केंद्रांना उपलब्ध करुन देणे ऐच्छिक असेल.तसेच या साहित्याची हानी,तूट-फूट झाल्यास अथवा हरवल्यास त्याची कोणतीही भरपाई परीक्षा केंद्राकडून अथवा परीक्षा परिषदेकडून मिळणार नाही.याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

(बी.डी.फडतरे)
उपआयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

१) शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सर्व./शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प).
२) सर्व केंद्रसंचालक व सर्व केंद्रसमन्वयक (IT-टिचर)
(GCC-TBC) परीक्षा केंद्र ऑगस्ट २०१६

E:\s\New letter\ALL GCC EXAM FILES\2016\Paripatrak.doc